# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिंसेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित, व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ द्वारा संचलित राज्य विद्यापीठ)

## महाविद्यालयीन शाखा

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर-४४००१०, दूरध्वनी क्रमांक : ०७१२-२५२९९३२ फॅक्स नं. ०७१२-२५५५७०१

दिनांक : 19-09-2013

क्रमांक : क्र.म.वि.२०१३-१४/४०(अ)

प्रती,

अध्यक्ष / सचिव,

शिक्षक बहुउद्देशिय शिक्षण मंडळ

प्लॉट नं ४९ साईनगर मस्जीद जवळ, वाडी नागपूर - 440023

द्वारा, श्री. हरीदासन महिला महाविद्यालय

चिचाळ/बारवा ता.- लाखांदुर, जि.- भंडारा - 441803

**विषय :- सत्र २०१३-१४ पासुन नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.**

संदर्भ :- 1) एनजीसी-२०१३/(१००/१३)मशि-४, दिनांक १५-०७-२०१३

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात येते की,उपरोक्त संदर्भांकित पत्रानूसार राज्य शासनाने आपल्या संस्थेला नवीन महाविद्यालय सत्र २०१३-१४ पासुन सुरु करण्यास दिलेल्या परवानगीनुसार व स्थानिय चौकशी समितीने केलेल्या शिफारशीनुसार मा.कुलगुरुंनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम १४(७)अंतर्गत विद्वत परिषदेच्या वतीने खालीलप्रमाणे नमुद अभ्यासक्रमाचे नवीन महाविद्यालयास सत्र २०१३-१४ पासून प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन राहून प्रदान करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

महाविद्यालयाचे नांव : श्री. हरीदासन महिला महाविद्यालय , चिचाळ/बारवा ता.- लाखांदुर, जि.- भंडारा - 441803

| | | |
|---|---|---|
| 1. | विद्याशाखा: गृह विज्ञान | विषय: As Per Syllabus |
| | अभ्यासक्रम: बॅचलर ऑफ सायन्स (होम सायन्स) | माध्यम: [मराठी] |
| | स्तर : निम्न पदवीधर | विद्यार्थी प्रवेश क्षमता: 120 |

### प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन प्रदान करण्यात येत आहे

१. उपरोक्त नवीन महाविद्यालयाला देण्यात आलेले प्रथम संलग्निकरण विद्यापीठाद्वारे गठीत स्थानिय चौकशी समितीने महाविद्यालयास भेट देऊन सादर केलेल्या अहवालात दर्शविलेल्या त्रृटी विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या अटीवर देण्यात येत आहे. (समितीच्या अहवालाची प्रत सोबत जोडलेली आहे.)

२. संदर्भांकित शासन परवानगीमध्ये नमूद केलेले संपूर्ण अटीचे पालन संस्थेन/महाविद्यालयाने विहीत कालावधीमध्ये पूर्ण करण्याच्या अटीवर संलग्निकरण देण्यात येत आहे.

३. विद्यार्थी संख्येचे निकष शासन निर्णय क्र.एनजीसी-१०९३/(५९१८)/मशि-३,दिनांक १९ जुन,१९९५ प्रमाणे महाविद्यालयावर बंधनकारक राहतील त्याचे उलंघन झाल्यास शासन निर्णय दि.२२.१.२००७ नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात यईल.

४. मंजुर प्रवेश क्षमतेनुसार ५० टक्के किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी प्रवेशित असल्यास सदर अभ्यासक्रम रद्द समजण्यात यईल.

५. विद्यापीठाने विहीत केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयांनी अध्यापक वर्ग/कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असुन इतर सर्व आवश्यक पायाभुत सोयी उपलब्ध करुन त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करुन विद्यापीठास तसे प्रमाणपत्र देण्याच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.

६. नवीन विद्याशाखा मंजुर करण्यात आलेल्या महाविद्यालयांनी ज्यांची स्थापना होऊन ५ वर्ष झाली आहेत त्यांनी एक वर्षात व ज्यांची ५ वर्ष झालेली नाहीत त्यांची ५ वर्ष पुर्ण होताच एक वर्षात NAAC अॅक्रेडिएशन प्राप्त करुन घ्यावे व ते या कालावधीत न मिळविल्यास सदर विद्याशाखा मान्यता आपोआप रद्द होईल या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

७. उपरोक्त अभ्यासक्रमाची परवानगी प्राचार्य व नियमित शिक्षक भरण्याच्या अटीवर देण्यात येत आहे.प्राचार्य व नियमित शिक्षकांची नियुक्ती न केल्यास विद्यार्थ्यांना दिलले प्रवेश रद्द होतील.

८. उपरोक्त महाविद्यालय कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास आपले महाविद्यालय तयार असून त्या आशयाचे हमीपत्र महाविद्यालयाने विभागिय सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर यांना सादर करण्याचे अटीवर ही मान्यता देण्यात येत आहे.

९. प्रथम संलग्निकरण प्राप्त झाल्यानंतर ज्या महाविद्यालयांनी वरील नमुद विविध अटी व शर्तीची पुर्तता केली नाही अशा महाविद्यालयांना पुढील वर्षाकरीता निरंतर संलग्निकरण देता येणार नाही व जर अशा महाविद्यालयानी पुढील सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया केली तर प्रवेशित विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठ घेणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

१०. ज्या अभ्यासक्रमाचे अभ्यासक्रमीका, अध्यादेश विद्यापीठात तयार नाही असे अभ्यासक्रम/विषय महाविद्यालयांनी सुरु करु नये.

११. कायम विना अनुदान तत्वावर संस्थेस महाविद्यालय आर्थिकदृष्ट्या चालविणे शक्य व्हावे यासाठी संस्थेने विद्यार्थ्यांकडून विद्यापीठ/शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या शुल्कानुसारच शुल्क आकारावे.

१२. महाविद्यालयाच्या बांधकामाचे मोजमाप करण्याकरीता अभियंता समिती महाविद्यालयाला भेट देऊन सादर केलेल्या अहवालातील अटीच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.

१३. वरील सर्व अटींची पुर्तता तसेच पुढील निरंतर संलग्निकरणाकरीता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद/राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद/बार कौन्सिल ऑफ इंडिया इत्यादी शिखर संस्थांनी घालुन दिलेल्या अटींची पुर्तता विहीत कालावधीत संस्थेने न केल्यास पुढील संलग्निकरण स्थगित होईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची/संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

१४. महाविद्यालयातील सदर अभ्यासक्रमाचे पूढील वर्षासाठी निरंतर संलग्निकरणाकरीता शुल्कासह आवेदनपत्र दि.३१ ऑगस्ट पूर्वी **www.onlinebcudrtmnu.org** या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करणे बंधनकारक राहील.

कृपया कळावे.

आपला,

(श्री.सो.भारंबे )
उप कुलसचिव (म.वि.)
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ,नागपूर

प्रतिलीपी माहितीकरिता सादर :-

१. मा.संचालक उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पूणे.
२. मा.सहसंचालक, (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर.
३. मा.संचालक (म.वि.वि.म.).
४ मा.वित्त व लेखा अधिकारी.
५. मा.परिक्षा नियंत्रक, यांना विनंती करण्यात येते की, सदर अभ्यासक्रमामध्ये प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा कमी प्रवेशित विद्यार्थी संख्या दिसून आल्यास अभ्यासक्रम /विषय / अतिरीक्त तुकडी रद्द करण्याकरीता विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना शिफारस करावी.
६. उपकुलसचिव विद्या विभाग.
७. सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग, गोपनिय विभाग, व्यावसयिक परीक्षा, परीक्षा व चौकशी.
८. संबंधित लिपीक, शिक्षक मान्यता.
९. संबंधित लिपीक, संलग्निकरण शाखा.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करावी

आपला,

(श्री.रमेश भलावे )
सहायक कुलसचिव (म.वि.)
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ,नागपूर